# वदान्यता

## अमी बन्सल यांच्याद्वारे लिखित भाष्य

श्रीगुरुमाईंनी जन्मदिनाच्या निमित्ताने सर्वांना एक अतिसुंदर उपहार दिला आहे. मला अतिशय आनंद होतो आहे की, गुरुमाईंच्या जन्मदिनी, २४ जून २०२१ रोजी त्यांच्यातर्फे सर्वांसाठी प्रदान केल्या गेलेल्या या सद्‌गुणरूपी उपहारावर भाष्य लिहिण्याची सेवा मला दिली गेली आहे.

## वदान्यता

एखादा नवीन शब्द जेव्हा माझ्यासमोर येतो, आणि विशेषतः तो शब्द जेव्हा श्रीगुरुमाईंकडून मिळालेला उपहार असतो, तेव्हा मला सर्वप्रथम जे करायला आवडते ते असते, त्या शब्दाचे मोठ्याने उच्चारण करणे. ते जणू तसेच असते जसे की गुरुमाईंकडून प्रसाद ग्रहण करणे आणि एका मंत्राच्या रूपात त्यांच्या प्रसादाचे रसास्वादन करणे. म्हणून मी तुम्हालादेखील असेच करण्यासाठी आमंत्रित करते आहे. हा शब्द वाचा, तुमच्या मनात याच्या अचूक उच्चाराचा अभ्यास करा, अक्षरांच्या सौंदर्याचा आनंद लुटा. उदाहरणार्थ, हा शब्द रोमन लिपीत लिहिल्यावर अनेक वेळा “a” [“अ”] हा स्वर येतो : va-dānya-tā (va-daanya-taa). हे काहीसे “आऽऽऽऽऽह” म्हटल्यासारखे आहे, असे वाटते की जणूकाही श्वास मोकळा होतो आहे, मुक्त होतो आहे. आता, या शब्दाचे काही वेळा मोठ्याने उच्चारण करा.

गुरुमाई आपल्याला जेव्हा काही सांगतात, तेव्हा आपल्याला आपल्या हृदयात, आपल्या संपूर्ण अस्तित्वात एका अलौकिक अनुनादाची अनुभूती होते. ते अवर्णनीय असते. याच कारणास्तव, गुरुमाईंनी आपल्याला प्रदान केलेल्या उपहारस्वरूपातील या सद्‌गुणाचे उच्चारण आपण जेव्हा मोठ्याने करतो, तेव्हा एक विशिष्ट भाव, एक आंतरिक स्थिती जागृत होते, एक परिचित वाटणारी पण तरीदेखील नवी व अनोखी अशी एक भावना जागृत होते जिच्यामध्ये दिव्य प्रेरणा निहित असते. तेव्हा पुन्हा एकदा, या शब्दाचे मोठ्याने उच्चारण करा किंवा तुमची इच्छा असल्यास तुम्ही मनातल्या मनातही याचे पुनरुच्चारण करू शकता :

### वदान्यता

तुम्ही या शब्दाचे उच्चारण जेव्हा कराल, तेव्हा त्याला तुमच्या शरीरातील प्रत्येक पेशीत स्पंदित होऊ द्या. फक्त त्याचा आनंद घ्या. त्याचे रसास्वादन करा. त्याच्या सौंदर्याला तुमच्या संपूर्ण अस्तित्वात व्याप्त होऊ द्या.

‘वदान्यता’ हा सद्‌गुण गहन अर्थांनी समृद्ध आहे. इतर कुठल्याही भाषेतील कोणताही शब्द ‘वदान्यता’ या शब्दाचा तंतोतंत अर्थ व्यक्त करू शकत नाही, तसेच त्या सर्व इतर गुणविशेषांनाही व्यक्त करू शकत नाही जे या शब्दात समाविष्ट आहेत आणि ज्यांना हा शब्द जागृत करतो.

म्हणून, इथे मी त्याच्या बहुआयामी अर्थांवर आणि बहुरंगी गर्भितार्थांवर प्रकाश टाकणार आहे, जेणेकरून तुम्हाला त्याचे सार समजावे, तुम्ही त्याच्या उत्कृष्टतेचे मोल जाणावे आणि तुमच्या सिद्धयोग साधनेत तुम्हाला त्याला कार्यान्वित करता यावे.

चला, सुरुवात करू या. ‘वदान्यता’ या शब्दाची उत्पत्ती संस्कृतच्या दोन मूळ धातूंपासून होऊ शकते : ‘वद्’ म्हणजे ‘बोलणे’ किंवा ‘व्यक्त करणे’ आणि ‘दा’ म्हणजे ‘देणे’. या व्युत्पत्तीमध्ये अनेक अंगभूत अर्थांची श्रृंखला समाविष्ट आहे, ज्यात समाविष्ट आहेत, उदारता, सद्‌भाव आणि हितेच्छा, मित्रत्व आणि सौजन्य, आणि त्याचबरोबर वाक्पटुता व सहृदयतेने बोलणे.

आता, आपण ‘वदान्यता’ या शब्दाच्या या विविध रसांविषयी विचार करू या आणि त्याबरोबरच हेदेखील पाहू या की प्रत्येकाच्या जीवनात ते कसे लागू होतात.

**वदान्यता म्हणजे उदारता, सद्‌भाव आणि हितेच्छा.**

‘वदान्यतेला’ प्रकट करणाऱ्या एखाद्या व्यक्तीमधील भलेपणाची चमक ही त्या सूर्यकिरणासारखी असते जो घनदाट जंगलातील काळोखाला प्रकाशित करतो. चांगुलपणाने ज्यांची हृदये भरलेली असतात असे लोक स्वाभाविकपणे एकमेकांची काळजी घेण्यावर आणि एकमेकांची पर्वा करण्यावर विश्वास ठेवतात. उदारशीलतेच्या चक्रावर त्यांचा विश्वास असतो ज्यामध्ये एका चांगल्या कृत्याने दुसरे चांगले कृत्य प्रेरित होते. ही सातत्याने घडत राहणारी प्रक्रिया ऊर्मीयुक्त प्रभावाला उमटवत राहते, ज्यायोगे इतर लोकांनादेखील प्रोत्साहन मिळते की, त्यांनी इतरांशी विचारशीलतेने वागावे व सहानुभूतीपूर्ण व्यवहार करावा. त्यांची उदारता स्वार्थविरहित असते कारण ते जगताला स्वतःचे सर्वोत्कृष्ट अर्पण करत राहण्याच्या संधी प्रमाणिकपणे शोधत राहतात. ज्या दिव्य सद्‌गुणांची शिकवण श्रीगुरुमाई देतात, त्या हृदयस्थ सद्‌गुणांना आपल्या जीवनात कार्यान्वित करण्यावर त्यांची दृढ निष्ठा असते आणि त्यांच्या याच निष्ठेमुळे त्यांच्या ठायी हा सद्‌भाव येत असतो. आणि त्यांच्यातील हितेच्छा या ज्ञानावर आधारलेली असते की, या ब्रह्मांडातील सर्वकाही *एकमेव* तत्त्व आहे; त्यामुळे, ते अशा जाणीवेसह आचरण करतात की जेव्हा एक व्यक्ती इतरांना मदत करते, तेव्हा ती व्यक्ती स्वतःलाही मदत करत असते. त्यांच्या देण्यात कुठेही हातचे राखून ठेवणे नसते आणि त्यांच्या परोपकारामध्ये कोणताही

अंतस्थ हेतू दडलेला नसतो. अशा लोकांच्या सद्‌गुणांची तुलना फक्त निसर्गाच्या अपरिमित समृद्धीशी, त्याच्या औदार्याशीच होऊ शकते.

एका सुपरिचित संस्कृत सुभाषितामध्ये ‘वदान्यता’ या सद्‌गुणाचे चित्र असे रेखाटले गेले आहे :

धत्ते भरं कुसुमपत्रफलावलीनां मर्मव्यथां स्पृशति शीतभवां रुजं च।
यो देहमर्पयति चान्यसुखस्य हेतोस्तस्मै वदान्यगुरवे तरवे नमोऽस्तु॥

मी त्या वदान्यतापूर्ण महान वृक्षासमोर नतमस्तक होतो,
जो पानांनी, फुलांनी आणि फळांनी लगडलेल्या
त्याच्या फांद्यांचे ओझे पेलतो.
आपल्या फांद्या प्रदान करून
तो यातना सहन करत राहतो,
आणि कडाक्याच्या थंडीतही खंबीरपणे उभा राहतो,
आणि अशा प्रकारे इतरांच्या सुखासाठी
तो आपला संपूर्ण देह बहाल करतो.[१]

***

**वदान्यता म्हणजे मित्रत्व आणि सौजन्य.**

वदान्यतेचे मूर्तिमंत रूप असलेल्या लोकांच्या स्वभावातच मित्रत्व आणि सौजन्य असते. ते स्वागतशील, अगत्यशील आणि दुसऱ्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्यास तत्पर असतात. मित्र म्हणून ते प्रेमळ असतात आणि त्यांच्या सहवासात सहजता आणि उत्स्फूर्तता अनुभवास येते.

महर्षी भर्तुहरी त्यांच्या ‘नीतिशतकम्‌ या ग्रंथात म्हणतात :

तन्मित्रमापदि सुखे च समक्रियं यत्‌

मित्र तो असतो, जो दुःखकष्ट आणि सुख,
अशा दोन्हीही प्रसंगी साथ देतो.[२]

चांगला मित्र तो असतो ज्याची अविचल उपस्थिती आणि मार्गदर्शन प्रतिकूल परिस्थितींमध्ये तुम्हाला बळ देते आणि हर्षाच्या समयी तो तुमचा आनंद वृद्धिंगत करतो.

संस्कृतमधील ‘मित्र’ हा शब्द, सूर्यदेवतेचेही एक नाव आहे. या पृथ्वीतलावर प्रकाश आणि जीवनशक्ती यांच्या स्त्रोत स्वरूपात सूर्य रोज प्रातःकाळी सर्व सजीवांना अविरतपणे जागृत करतो, जीवन जगण्यासाठी, श्वासोच्छ्वास घेण्यासाठी आणि वृद्धिंगत होण्यासाठी त्यांना साद घालतो. या विश्वाचा मित्र या नात्याने सूर्य समस्त सृष्टीची देखभाल करतो तसेच पृथ्वीचे आणि ग्रहांचे पोषण करतो. सूर्य सर्वांचा समान मित्र आहे, मग ते पशुपक्षी असोत, मानव असोत, वृक्ष असोत, नद्या, पर्वत अथवा सागर असोत.

***

**वदान्यता म्हणजे वाक्पटुता आणि सहृदयतेने बोलणे.**

शब्द—मग ते बोललेले असोत, लिखित असोत अथवा विचारांद्वारे अनुभवलेले असोत—आपल्या स्वतःला व्यक्त करण्याचा आपल्यापाशी असलेला प्रमुख मार्ग आहेत. आपल्या शब्दांचा आपल्या जीवनावर, आपल्या प्रारब्धावर आणि आपल्या प्रियजनांवर चिरस्थायी प्रभाव होतो—शब्द जोडूही शकतात आणि मोडूही शकतात, एखाद्याला चैतन्यमय करू शकतात अथवा नाउमेद करू शकतात. ‘वदान्यता’ हा सद्‌गुण आपल्याला हे शिकवतो की, आपण स्वतःला काळजीपूर्वक व स्पष्टपणे व्यक्त करावे. आपण जेव्हा आपल्या परस्परांतील संवादामध्ये सुस्पष्टता आणतो, तेव्हा आपण ‘वदान्यता’ प्रकट करत असतो.

‘वदान्यता’ भगवंताच्या औदार्याला आणि प्रेमाला शब्दांद्वारे प्रतिबिंबित करते. ती आपल्याला सहृदयतेने बोलण्याकरता मार्गदर्शन करते. सहृदयतेने बोलणे म्हणजे खोटेपणाने “गोडगोड” बोलणे नव्हे. जेव्हा आपण आदरयुक्त आणि तरीही प्रामाणिक असतो, तेव्हा आपण सहृदयतेने बोलतो. आपण जेव्हा स्पष्टपणे विचार मांडतो, तेव्हा आपण वाक्पटुतेने बोलतो. जेव्हा आपल्या शब्दांमागील आपला *उद्देश* इतरांना आधार देणे हा असतो, तेव्हा आपण मधुरतेने बोलतो. आपले शब्द जेव्हा विचारपूर्वक निवडलेले असतात, तेव्हा ‘वदान्यता’ हा सद्‌गुण अतिशय तेजस्वीपणे चमकतो.

***

वदान्यता म्हणजे उदारता, सद्‌भाव आणि हितेच्छा.

वदान्यता म्हणजे मित्रत्व आणि सौजन्य.

वदान्यता म्हणजे वाक्पटुता आणि सहृदयतेने बोलणे.

मी तुम्हाला 'वदान्यता' या सद्‌गुणाच्या विविध रसांचे बारकाईने निरीक्षण करण्यासाठी आमंत्रित करते. तुम्ही जर तुमच्या सभोवताली पाहिलेत, तर तुम्हाला अशी अनेक उदाहरणे सापडतील ज्यांमध्ये तुम्हाला आढळेल की जड-चेतन सर्वांतून हा उदात्त सद्‌गुण प्रसरित होतो आहे. माझा दृढ विश्वास आहे की 'वदान्यता' हा सद्‌गुण आपल्यासमोर प्रकट करून आणि जन्मदिनाचा एक उपहार म्हणून आपल्याला तो प्रदान करून गुरुमाई यावर भर देत आहेत की—आपल्या साधनेत कोणत्याही समयी आणि विशेषतः या अशांततापूर्ण व अनिश्चिततेने भरलेल्या समयी—आपण सजगतेने या सद्‌गुणाचे रक्षण करणे, याचा अभ्यास करणे आणि याचे मूर्तिमंत रूप बनणे आवश्यक आहे, कारण तो आपल्या जीवनात व इतरांकरितादेखील एक आश्रयस्थान म्हणून कार्य करेल.

'वदान्यता' या सद्‌गुणाचा बोध आपल्याला एक दृष्टी प्रदान करेल, जी भारताच्या ऋषीमुनींची दृष्टी होती आणि ज्याविषयी त्यांनी त्यांच्या शिष्यांना उपदेश केला. या प्रेरणादायी दृष्टीविषयी समजावून सांगताना वसिष्ठ ऋषींनी म्हटले आहे :

समदृष्टिरुदारात्मा वदान्यः संविभागवान्<br>
पेशलस्निग्धमधुरः सुन्दरः पुण्यकीर्तनः॥

ज्ञानी महात्म्यांची समदृष्टि असते,<br>
आणि ते विशालहृदयी, उदार व परोपकारी असतात.<br>
ते शांत, प्रेमळ असतात,<br>
त्यांच्या वाणीमध्ये सहृदयता असते<br>
आणि त्यांचे रूप सुंदर असते.<br>
त्यांच्या पुण्यकर्मांमुळे ते खऱ्या अर्थाने प्रसिद्ध होतात.[३]

हे सुंदर आहे ना? हे एक अद्‌भुत लक्ष्य नाही का, ज्याची प्राप्ती करण्याची आपण कल्पना करावी, ज्यासाठी आपण प्रयत्नशील राहावे आणि ज्याच्या अनुरूप आपले जीवन जगावे?

माझा दृढ विचार आहे की, गुरुमाई जेव्हा आपल्याला काही प्रदान करतात, तेव्हा त्याची अनुभूती करण्यास आपण सक्षम आहोत यावर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. म्हणून मी तुम्हाला प्रोत्साहित करते की, तुमच्या अंतरी 'वदान्यता' हा सद्‌गुण *निश्चितच आहे* हे तुम्ही जाणावे. तुमच्या अंतरी निहित असलेल्या या अनोख्या गुणांचे वर्णन कसे करावे हे कदाचित तुम्ही आतापर्यंत जाणत नव्हता, पण आता तुम्ही ते जाणता.

## वदान्यतेसाठी अभिकथन

मी वदान्यतेच्या विविध रंगांनी व्याप्त आहे.

*[अभिकथन—ते कथन ज्याचे जागरूकतेसह वारंवार उच्चारण केले जाते, जेणेकरून ते आपल्या चेतनेत स्थिरावेल.]*

---

[१] सुभाषित; इंग्रजी भाषांतर © एस. वाय. डी. ए. फाउंडेशन २०२१.

[२] भर्तुहरी; नीतिशतकम् ६८; इंग्रजी भाषांतर © एस. वाय. डी. ए. फाउंडेशन २०२१.

[३] योगवासिष्ठ ७.१७०.३४; इंग्रजी भाषांतर © एस. वाय. डी. ए. फाउंडेशन २०२१.

©२०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.